नगरपरिषद येथील रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्याबाबत.

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**परिपत्रक क्र.नपप्रसं/६/३०-जीओ/१/रोजंदारी/२००५/प्र.क्र.२७५/(५)२६**
**दिनांक : २६ जून २००६**

वाचा : शासन नगर विकास विभाग क्र. लवेसू - १००६/५५६/प्र. क्र. ५९/२००६/नवि-१८, दि.२४.५.२००६

## प रि प त्र क

०१. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. बीसीसी ११८५/सीआर १८३/९५/३ दि. २४.६.१९८६ अन्वये नगरपरिषदांनी रोजंदारी कर्मचारी भरती न करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच संचालनालयाचे परिपत्रक क. एमपीके -११९३/प्र.क्र.९८/९३/६, दि. २१.७.१९९३ व पत्र दि. नप्रसई - १००३/प्र. क्र. ३६८/०३/५, दि. ३.१.२००४ नुसार रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबत कारवाई करणेबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तरी सुध्दा न्यायालयीन स्थगिती वगैरेमुळे काही रोजंदारी कर्मचारी अद्यापि कार्यरत आहेत असे दिसून आले आहे.

०२. नगरपरिषदांमध्ये रोजंदारीवर कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार वेतन देणे बंधनकारक असल्याने संबंधित जिल्हयाकरीता लागू केलेल्या दराने किमान वेतन देण्यात यावे. मात्र रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू केल्यामुळे नगरपरिषदेवर पडणाऱ्या अर्थिक भारासाठी कुठल्याही प्रकराचा निधी शासन अथवा संचालनालयाकडून मिळणार नाही. नगरपरिषदांनी कायद्याप्रमाणे किमान वेतन न दिल्यास पुढील अर्थिक सहाय्य वितरीत केले जाणार नाही. तरी सर्व नगरपरिषदांनी रोजंदारी कामगारांना किमान वेतन कायदा १९४८ नुसार रोजंदारी वेतन देणेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करुन मान्यता घेणेची आहे.

०३. दि.२७.३.२००० नंतरच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना विहित पध्दतीनुसार कमी करण्यात यावे आणि नगरपरिषदांनी नवीन रोजंदारी कर्मचारी नेमण्यात येऊ नयेत अशा स्पष्ट सूचना सर्व नगरपरिषदांना यापुर्वीच देण्यात आलेल्या आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे/शासनाचे आदेशानुसार कार्यवाही न केल्याने रोजंदारी कर्मचारी कार्यरत असल्यास याबाबत जबाबदारी निश्चित करुन या कार्यालयाचे गोपनीय पत्र क्र.नपप्रस/अनियमित-रोजंदारी/वसुली/२००५/प्र. क्र. ५५५/२६, दि.१२.७.२००५ नुसार अशा नेमणूकांस जबाबदार असलेल्या मुख्याधिकारी / मुख्य लिपिक / लेखापाल / लेखाधिकारी व संबधित पदाधिकारी यांचेकडून रोजंदारी वेतनावरील खर्च वसुल करणेत येईल याची नोंद सर्व संबंधितांनी घेणेची आहे. वसूलीबाबत कार्यवाही करावी.

मा. आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने.

(दिलीप पायगुडे)
उपसंचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) मुख्याधिकारी (सर्व), २) जिल्हाधिकारी (सर्व), ३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व),
४) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व), ५) कक्ष अधिकारी, नवि-१८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, ६) कार्यासन अधिकारी, (सर्व) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, ७) निवड नस्ती.